# अखंड यात्री

चंद्र, सूर्य हे अखंड यात्री,
सदैव विहरती  दिवस नी रात्री,
प्रतिमा तयाची शीतल मनोहर,
ढाळीत असे जणू मनावर या कहर.

मिहिरा  तुझे हे प्रेम किती रे,
मृत्यस रोज कवेत घेतो रे,
श्वासा वर त्या आधिकार माझाच,
शंका का मनी  असते मग उगाचं,

प्रातः समयी उभा असतो तो स्मीत हास्यानी,
भू वरी उधळीत रंग दोन्ही हातांनी,
प्रत्येकाला हवास तू प्रकाश देण्यास अंधारात,
मी आहे कायम सोबतीला तिमिरात,

रजनी समयी तू आणि मी सोबती,
कोणी नको या समयी अवती भोवती,
चंद्रिकेस  बिलगू लागतो चंद्रमा जसा,
तू ही भासू लागलाय तसाच काहीसा.



रूप  आपुले मोहक मनोहर,
एकरूप ते दावी जगता सत्वर,
उभे  असू कायम असेच  तत्पर,
दावाया जगाला प्रेम  आपुले सत्वर.

डॉ. सारिका गौतम बहिरट

# मनाचे ओझे

कोण नसते कोणाचे तरी खेळ चालतात मनाचे,
मी च का , मलाच अस का प्रश्न असतात मनाचे,
मी बाकी सगळ्यांच्या मनाचा विचार करायचे,
कोण का नाही करत  विचार माझ्या  मनाचे,

तू स्वतःला विसरून विचार केलास इतरांच्या मनाचा ,
तू स्वतःला विसरून विचार केलास भाव भावनांचा,
तू स्वतःला विसरून विचार केलास केवळ कामांचा,
तू स्वतःला विसरून विचार केलास का कधी मनाचा,

मन म्हणे दिसतं नाहीं तरी अस्तित्व नाकरण  सोपं नाही,
मन म्हणे दिसतं नाहीं तरी त्याला विसरण सोपं नाही ,
मन म्हणे दिसतं नाहीं तरी रडत का मग कळतं नाहीं,
मन म्हणे दिसतं नाहीं अशी का अवस्था कळतं नाहीं,

मन कधी मानत नाही की मन मोकळं करत नाहीं,
तिथे पण इतरांच्या मनाचाच विचार करत राही
मन कधी स्थिर तर कधी अस्थिर  यात अडकत,
मन कधी कोणाशी बोलू पाहत नाही

मन हे मनाताच सलत राही,
मना ए मना सावर रे सावर स्वतःला
मना ए मना आवर घाल तुझ्या मना ला
मन  आहे तुझे ...
का घेतोय त्या मनाचेच ओझे........

मन वेड आहे त्याला तुझीच ओढं आहे,
तू आणि मी काही वेगळे नाही  ,
तुझ्याच डोळ्यात मी माझी प्रतिमा पाही,
मन वेड आहे त्याला  तुझ्या प्रेमाची जोड आहे.
तुला काय सांगू , मन माझे तर  तुझ्या मनात आहे

डॉ. सारिका गौतम बहिरट

# वटवृक्ष

ब्रह्मा, विष्णु आणि महेशाचे निवासस्थान असे वटवृक्ष,
ध्यानस्थ ऋषींचा मान असे ज्यास असे वटवृक्ष,
नविन पालवी फुलवी असे अक्षय वृक्ष,
औषधी गुणधर्म असतो जया अंगी असे संसारवृक्ष,
कायम सदाहरित सदापर्णी असे वटवृक्ष,

राष्ट्रीय वृक्षाचा ज्यास आहे मान असे वटवृक्ष,
मघा नक्षत्रास पूजेचा मान असे आराध्यवट,
गोपालकृष्ण चे द्रोणपात्र असे कृष्णवट,
प्राणवायू पुरवूनी सत्यवानासी तारी वटवृक्ष,

जन्मा पासूनी मृत्यू पर्यंत साथ देई वटवृक्ष,
प्राणवायूची किंमत आज जगाला साऱ्या कळाली,
मृत्यूशी झुंज देताना ....जेंव्हा त्यास मिठी मारली,
आता तरी वाचवा आपल्याला तारणाऱ्या शिलेदराला,
आता तरी वाचवा आपल्याला वाचविनाऱ्या महान दात्याला.



डॉ. सारिका गौतम बहिरट

चला आज आपण सगळे मिळून एक संकल्प करूयात
या वटपौर्णिमेच्या दिवशी एक तरी झाड लावूयात !!!

जिजाऊ

सिंदखेड राजा असे जिचे जन्मस्थान,

आजही सारे गातात जिचे गुण गाणं,

महाराष्ट्राची जी आहे  आण, बाण,शान

राष्ट्रमाता म्हणविण्याचा जिला बहुमान,



ती तुम्हा आम्हा सर्वांची जिजाऊ.

तनया ती लखुजी जाधवांची,

पुत्रवधू भोसले घराण्याची,

भार्या झाली शहाजी राजांची,

माऊली ती शिवबाची,

राजमाता अख्ख्या महाराष्ट्राची.

अधर्माशी धर्माने वागणाऱ्या,

मुर्तिरुपी देवतांना मावळ्यांरुपी पाहणाऱ्या

जनतेला आपल्या मुलांप्रमाने जपणाऱ्या,

स्वराज्याकरिता लढा देणाऱ्या,

उभ्या महाराष्ट्राला मुक्ती मिळवून देणाऱ्या,

छत्रपती व्हावं ही इच्छा बाळगणाऱ्या मॉसाहेब.

थोर संस्कारांची शिदोरी तुझ्या अंगी

उभे राष्ट्र कायम राहतील तुझेच ऋणी

**शतशः प्रणाम तुजला तुझ्या जन्मदिनी**

डॉ. सारिका गौतम बहिरट
१७ जून २०२१

# साक्षात्कार

शतकामागुन शतके गेली,
महाभयंकर संकटे अनेक आली
प्रत्येकाने केली त्यावर मात
त्यांच्याशी करूनी दोन हात
दिवस अन रात्र गाळूनी घाम
उभा आहे त्यातुनही तो ठाम
देवी देवतांनी ही मास्क लावला
भू वरचा खरा देव सर्वांना दावला
परमेश्वर पाहिला का हो कोणी
कुठे गेलेत आता सारे ऋषी मुनी
कोरोना ला द्यावया लढा
डॉक्टर, नर्स,शेतकरी, पोलीस मित्र खडा
माणूस लागला पैशामागे धावू
घे विश्रांती सक्तीची,घरीच राहू
कामवाली मावशी आहे ती
पैसे मोजतो म्हणून करते काम ती
तिला पण आहे की अस्तित्व
साऱ्यांनाच कळाले आता तिचे महत्त्व
तु , तु तर काय घरातच असते
तुला कुठे काय काम असते
आता मात्र तिचे ही कष्ट साऱ्यांनाच दिसते
किती,किती त्रास तु साऱ्यांसाठी सोसते
साऱ्यांचाच हातभार लागलाय घरकामाला
थोडासा न्याय आता तिला पण मिळाला
हॉटेल, मॉल, थिएटर पडले सारे ओस
जात होतो तिथे सारेच राजरोस,
तु छान काही करत नाही मम्मी
घरातली भाजी भाकरी आता वाटू लागली यम्मी
माणसं माणसांपासून होती दुरावलेली
आपल्याच विश्वात जणुकाही हरवलेली.
डॉक्टर कडे जाणे कधी प्रतिष्ठेचे वाटे
आता डॉक्टरकडे जाण्याने ही अश्रु दाटे
इवल्याश्या जिवाणू ने जगणे केले मुश्किल
त्याच्या वावराणे सारेच झाले खजिल
जात, पात,धर्म, सार काही मानवनिर्मित
रोगांनी जखडलय मन, शरीर बसलोय मिरवीत.